झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण

OW-19695

जा.क्र.झोपुप्रा/उजि/३क/रिध्दिसिध्दिसह.गृह/सुनावणी/कावि-७०२५४/२०१८
दिनांक : 28 NOV 2018

प्रति,

| | |
|---|---|
| १) अर्जदार<br>श्री विदित भूषण उमाशंकर (मुख्यप्रवर्तक)<br>गांव-मोगरा, तालुका-अंधेरी, पास्कल चाळ, शंकरवाडी, जोगेश्वरी (पूर्व), मुंबई-४०००६० | २) श्री मोहन सुब्रमण्यम (संचालक) ओमकार रिअलटर्स अंधेरी प्रोजेक्ट प्रा. लि<br>ओमकार हाऊस ऑफ इस्टर्न एक्सप्रस हायवे, ऑप सायन चूनाभट्टी सिग्नल, सायन (पूर्व), मुंबई-४०००२२ |
| ३) जमीनमालक/हरकतदार<br>जमीन मालक श्री फ्रेडी हेन्रीक्स यांचे वारस<br>श्रीमती मेगन गोन्सालविस<br>यांचेतर्फे<br>ॲड. श्री डेनिस फ्रान्सिस लोबो<br>५१ मासाबिल्ले,१३६-अ, पाली रोड, बांद्रा (पश्चिम) मुंबई-४०००५०. | ४) हरकतदार<br>श्री विरेंद्र पांडे (प्रोपरायटर)<br>मे. ग्लोबल इन्फ्राबिल्ट अॅन्ड फिनलिस कंपनी<br>यांचेतर्फे<br>ॲड अजित शोभावत<br>५१ मासाबिल्ले, १३६-अ, पाली रोड, बांद्रा, मुंबई-४०००५० |
| ५) धारक- १) श्रीमती एलीयन हॅड्रीक्स<br>नभूक्र. ३४६, ३४६/१ ते ६ | ६) धारक- १) श्रीमती सेरा मेरी<br>२) श्री ॲथनी हेन्रीक्स<br>३) श्री केनेथ हेन्रीक्स<br>४) श्री सिरियल हेन्रीक्स<br>५) श्री जोशी हेन्रीक्स<br>६) श्री सिकफ्रेड हेन्रीक्स<br>७) श्री फ्रेडी हेन्रीक्स<br>८) श्री इंडिन हेन्रीक्स<br>(नभूक्र. ४३१) |
| ७) इमलामालक- श्री पास्कोल बाप्टीस्टा<br>नभूक्र. ३४६, ३४६/१ ते ६ | |

**विषय** :-मौजे-मोगरा, तालूका- अंधेरी, न.भु.क्र. ३४६ पै, ३४६/१ ते ६, ४३१ पै या मिळकतीवरील रिध्दि सिध्दि गृहनिर्माण संस्था नियो संस्थेचे क्षेत्र महाराष्ट्र झोपडपट्टी (सु.नि.व पू.) अधिनियम १९७१ चे कलम ३क(१)अंतर्गत झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र घोषित करणे प्रकरणी सुनावणीबाबत.

**संदर्भ** :-१) अर्जदार श्री विदित भूषण उमाशंकर मिश्रा (मुख्यप्रवर्तक) रिध्दी सिध्दी एसआरए सह.गृह.संस्था नियो यांचे दि. ०७/०७/२०१७ रोजीचा प्रस्ताव

२) अर्जदारश्री मोहन सुब्रमण्यम (संचालक), ओमकार रिअलटर्स अंधेरी प्रोजेक्ट प्रा.लि. यांनी दि.१२/०३/२०१८ रोजी दाखलकेलेला प्रस्ताव

३) ॲड. श्री डेनिस फ्रान्सिस लोबो यांचे दि.०४/१०/२०१८ रोजीच्या हरकती
४) ॲड. श्री अजित शोभावत यांची दि.११/१०/२०१८ रोजीची हरकत

उपरोक्त विषयानुसार महाराष्ट्र झोपडपट्टी पुनर्वसन (सु.नि.व पु.) अधिनियम १९७१ चे कलम ३क(१) नुसार झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र घोषित करणेकरिता अर्जदार श्री विदित भूषण उमाशंकर मिश्रा (मुख्यप्रवर्तक) यांचेकडून दि.०७/०७/२०१७ रोजी व अर्जदार ओमकार रिअलटर्स अंधेरी प्रोजेक्ट प्रा.लि. यांचेकडून दि.१२/०३/२०१८ रोजी प्रस्ताव प्राप्त झाला आहे.

त्यानुसार प्रकरणी दि.२८/०६/२०१८ रोजी प्रत्यक्ष जागेवर जावून स्थळपाहणी करण्यात आलेली आहे. उपरोक्त मिळकतीचे क्षेत्र झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र घोषित करणेबाबत हितसंबधितांचे आक्षेप/हरकत नोंदविणेकरीता इकडील विभागाकडून दि. १२/०९/२०१८ रोजी मराठी व इंग्रजी भाषेतील जाहिर सुचना दि.१५/०९/२०१८ रोजी दैनिक "सामना" या मराठी वृत्तपत्रात व दैनिक "दि आफ्टरनून" या इंग्रजी वृत्तपत्रात प्रसिध्द करण्यात आली आहे. तसेच सदरची अधिसुचना प्राधिकरणाच्या संकेतस्थळावर दि. १७/०९/२०१८ रोजी व संस्थेच्या जागेवर सार्वजनिक ठिकाणी दि.०३/१०/२०१८ रोजी प्रसिध्द करण्यात आली आहे. त्यानुसार मिळकतीशी हितसंबधीत व्यक्तींनी संदर्भ क्र. ३ व ४ नुसार पत्राद्वारे हरकत उपस्थित केली आहे.

सदर प्रकरणी आपले म्हणणे ऐकून घेणेकामी मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांचे समोर **दि.०६/१२/२०१८ रोजी दुपारी १२.०० सुनावणी कक्ष तिसरा मजला, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, अनंत काणेकर मार्ग, बांद्रा (पूर्व) मुंबई ४०००५१** येथे सुनावणी ठेवण्यात आली असून सदर सुनावणीस आपण सर्व संबंधित कागदपत्रासह उपस्थित राहून आपले म्हणणे मांडावे. आपण सदर दिवशी व वेळी सुनावणीस उपस्थित न राहिल्यास आपणांस काही सांगावयाचे नाही असे गृहित धरुन नियमानुसार पुढील निर्णय घेण्यात येईल याची नोंद घ्यावी.

27/11/18

**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकरिता**